| MHKO070022292023 | **नियमीत दिवाणी दावा क्र.१७६/२०२३**<br><br>रंगराव दत्तू कदम<br>–विरुध्द–<br>विठ्ठल दत्तू कदम – मयत – तर्फे वारस आणि इतर |
|---|---|

## नि.क्र.४३ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१अ ते ड यांनी त्यांचेविरुध्द झालेला कैफियत नाहीचा आदेश रद्द होवुन मिळणेकामी तसेच प्रतिवादींची कैफियत सामील करुन घेणेकामी दाखल केलेला आहे. वादी यांनी नि.क्र.४४ वर त्यांचे सविस्तर म्हणणे दाखल करुन प्रतिवादींचा अर्ज र.रु.१,०००/– खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटप, पृथक कब्जा आणि कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१अ ते ड यांच्या अर्जामध्ये नमुद कारणांचे अवलोकन करता सदरचे कारण तसेच दाव्याच्या स्वरुपाचा व नैसर्गिक न्याय तत्वाचा विचार करता प्रतिवादी यांना त्यांची केस ही कैफियतीच्या माध्यमातून मांडणेची संधी देणे योग्य व न्यायोचित वाटते. जर प्रतिवादी यांना त्यांची कैफियत दाखल करणेस परवानगी न दिलेस तर त्यांचा बचावाचा हक्क नाकारल्यासारखे होईल. शिवाय प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेतलेस प्रस्तुत वादी यांचे कोणतेही नुकसान संभवत नाही. उलट प्रस्तुतच्या कैफियतीने दावा हा गुणदोषावर निर्णीत करणेसाठी उपयुक्त ठरणार आहे. करिता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो –

**– <u>आदेश</u> –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.४३) हा रक्कम रु.३००/– खर्च म्हणुन वादी यांना देणेच्या मंजूर करण्यात येतो.

P S BHOSALE

Digitally signed by P S BHOSALE
Date: 2026.07.02 17:12:56 +0530

दि.०२/०७/२०२६

**(पी. एस. भोसले )**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर